शनिवार, दि. २६ एप्रिल २०२५ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक २६२ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४

8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

# विजेच्या कडकडाटासह पावसाची शक्यता

## नागरिकांनी सावधगिरी बाळगण्याचे आवाहन

*जालना । प्रतिनिधी* - प्रादेशिक हवामानशास्त्र केंद्र, कुलाबा, मुंबई यांनी दिलेल्या सूचनेनुसार जालना जिल्हयात दि. २५ ते २७ एप्रिल २०२५ रोजी यलो अलर्ट जारी केला असुन या कालावधीमध्ये तुरळक ठिकाणी विजेच्या कडकडाटासह पावसाची व ताशी ३० ते ४० कि.मी. प्रति तास वेगाने वारे वाहण्याची शक्यता वर्तवली आहे. या नैसर्गिक आपत्ती संदर्भात सर्व संबंधीत यंत्रणा आणि जनतेने खबरदारी घ्यावी, खबरदारीची उपाययोजना म्हणून खालीलप्रमाणे काळजी घ्यावी.

**हे करावे** : विजेच्या गडगडाटासह पावसाची पूर्वकल्पना असल्यास बाहेर जाणे टाळा. जर मोकळया जागेत असाल आणि जवळपास कुठल्याही सुरक्षित इमारतीचा आसरा नसेल तर सखल जागेत जाऊन गुडघ्यात डोके घालून बसा. आकाशात विजा चमकत असल्यास घरात किंवा सुरक्षित इमारतीत आश्रय घ्या. घराच्या बाल्कनी, छत अथवा घराबाहेरील ओट्यावर थांबू नका. आपण घरात असाल आणि घरातील विद्युत उपकरणे चालू असतील तर त्या वस्तू त्वरित बंद करा. तारांचे कुंपण, विजेचे खांब व इतर लोखंडी वस्तूंपासून दूर रहा.पाण्यात उभे असाल तर तात्काळ पाण्यातून बाहेर पडा.

**हे करु नका** : आकाशात विजा चमकत असल्यास घरातील लँडलाईन फोनचा वापर करू नका. शॉवरखाली आंघोळ करु नका. घरातील बेसिनचे नळ, पाण्याची पाईपलाईन यांना स्पर्श करु नका तसेच कुठल्याही विद्युत उपकरणांचा वापर करू नका. विजेच्या गडगडाटासह वादळी वारे चालू असताना लोखंडी धातूच्या सहाय्याने उभारलेल्या तंबूमध्ये किंवा शेडमध्ये आसरा घेऊ नका. उंच झाडाच्या खाली आसरा घेऊ नका.धातूंच्या उंच मनो-याजवळ उभे राहू नका. जर आपण घरात असाल तर उघड्या दारातून अथवा खिडकीतून वीज पडताना पाहू नका. हे बाहेर थांबण्याइतकेच धोकादायक आहे. असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी (जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण) गणेश महाडिक यांनी केले आहे.

### देशवासीयांनी एका विचाराने सरकार सोबत राहिले पाहिजे- शरद पवार

**पुणे** - काश्मीरमधील पहलगाम येथे मंगळवारी (दि. २२) रोजी झालेल्या दहशतवादी हल्ल्यात २६ जणांचा दुर्दैवी मृत्यू झाला. यात महाराष्ट्रातील सहा पर्यटकांचा मृत्यू झाला आहे. या घटनेनंतर देशभरात संताप व्यक्त केला जात आहे. आता या दहशतवादी हल्ल्यावर राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी पहिली प्रतिक्रिया दिली आहे.

शरद पवार म्हणाले की, काश्मीरमध्ये जे झाले त्या प्रश्नाकडे सगळ्या देशवासीयांनी **पान २ वर**

# मुलांचे संरक्षण ही सामाजिक जबाबदारी - न्या. वर्षा मोहिते

## इन्नरव्हील क्लब ऑफ जालना होरायझनतर्फे पोक्सो कायद्याबाबत विद्यार्थ्यात जनजागृती

**जालना । प्रतिनिधी** - मुलांचे संरक्षण करणं ही फक्त तुमच्या आईवडिलांची किंवा शिक्षकांची जबाबदारी नाही तर संपूर्ण समाजाची आहे. परंतु, मुलांनी स्वतःची जबाबदारीही ओळखायला हवी. कुणालाही तुमच्या शरीरास वाईट हेतूने स्पर्श करू देऊ नका. जे चुकीचं वाटतं, त्याविरोधात आवाज उठवा. बाल लैंगिक छळ संरक्षणासाठी पोक्सो कायद्यांतर्गत २० वर्षापर्यंत शिक्षेची तरतूद आहे. त्यामुळे शालेय जीवनात प्रेम प्रकरणाच्या भानगडीत पडू नका. त्यातूनच संबंध प्रस्थापित होतात आणि त्याचे गंभीर परिणाम आयुष्यावर दूरगामी परिणाम करणारे असतात. त्यामुळे मुलांनी दक्षता घ्यावी, असा सल्ला प्रधान जिल्हा व सत्र न्यायाधीश वर्षा मोहिते यांनी येथे बोलताना दिला.

ईन्नरव्हील क्लब जालना होरायझन आणि विधी सेवा प्राधिकरण यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवार दि. २५ एप्रिल रोजी येथील एमआरडीए स्कूलमध्ये इयत्ता सहावी ते दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित पोक्सो कायदा जनजागृती कार्यक्रमात न्या. मोहिते बोलत होत्या. व्यासपीठावर जिल्हा विधी सेवा प्राधिकरणच्या सदस्य सचिव न्या. प्रणिता भारसाकडे- वाघ, बाल न्याय मंडळाच्या अध्यक्ष तथा प्रथम न्यायदंडाधिकारी आर. एन. मुजावर, क्लबच्या अध्यक्ष ॲड. अश्विनी धन्नावत, स्कूलच्या व्यवस्थापकीय संचालिका ईश्वरी चव्हाण, प्रिया नायर, विकास कदम यांची उपस्थिती होती. न्या. मोहिते पुढे म्हणाल्या की, प्रत्येक कायद्यात बालक या शब्दाची वेगवेगळी व्याख्या केली असून, त्यानुसार वेगवेगळी शिक्षा आहे. पोक्सो कायदा म्हणजे फक्त एक कायदेशीर तरतूद नाही, तर मुलांचं संरक्षण करण्याचं भक्कम शस्त्र आहे. आपण सर्वांनी एकजुटीने, सजगपणे आणि संवेदनशीलतेने या विषयाकडे पाहिलं, तरच आपण आपल्या मुलांना सुरक्षित आणि अभयाचं आयुष्य देऊ शकू, असे त्या म्हणाल्या. न्या. प्रणिता भारसाकडे- वाघ यांनी विधी सेवा प्राधिकरणाचे महत्त्व



विशद करून सविस्तर मार्गदर्शन केले. न्या. आर. एन. मुजावर यांनी बाल न्याय अधिनियमाबाबत माहिती दिली. क्लबच्या अध्यक्ष तथा न्याय मंडळ सदस्य, स्थानिक तक्रार समिती सदस्य ॲड. अश्विनी धन्नावत यांनी पॉश या कायद्याची माहिती देताना सांगितले की, कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ संरक्षण कायद्यांतर्गत ज्या कार्यालयात किमान दहा लोक असतील तेथे अंतर्गत तक्रार समिती आणि दहापेक्षा अधिक असतील तर विशाखा समिती स्थापन करणे बंधनकारक असते. कुठे लैंगिक छळ होत असल्यास कुणाकडे दाद मागायची, याबाबतची सविस्तर माहिती त्यांनी दिली.

याप्रसंगी ॲड. महेश धन्नावत, श्रीमती सुमन श्रीधरन, शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## युवा आदर्श

### तीचं कथा ...

कर्णबधीर भोवतालं
मुळी मिळेना श्रोता
कुणापुढे सांगायची
सांगा मी यशोगाथा
प्रौढी मिरवावी कशी
कशी सोसावी व्यथा
झगझगाटात दिपले
रे प्रयास समस्त वृथा
भूतकाळात इतिहास
प्रत्येकांची तीचंकथा
उगवत्याचा जयकार
वंश परंपरागत प्रथा
कोण करी नमस्कार
मोडीत निघाल्या रथा
सत्ताधीश अग्र भागी
मागे चाललायं जथा
निरूपयोगी दूर ठेवा
स्वाभाविक अनास्था
उपयुक्त जे जे आपले
असो विशेष व्यवस्था
आठव बास्तना शोभे
रे जगन्मान्य शिरस्ता
आसवा मिळेक्वचीत
बाहेर पडण्यास रस्ता
कहाणी माझी निरस
चावून चघळून चोथा
भविष्य प्रत्येकां प्रिय
भूतकाळ शेवटीहोता
आशीर्वाद द्यावे आता
समजावे मनअस्वस्था
आयुष्याची परिपूर्णता
महत्वपूर्ण कृतावस्था

हेमंत मुसरीफ पुणे
9730306996.

# गाव जलसमृद्ध करण्यासाठी प्रयत्न करावा- तहसिलदार खटावकर

**घनसावंगी । प्रतिनिधी** - घनसावंगी तालुक्यातील शेतकऱ्यांनी समस्त महाजन ट्रस्ट, मुंबई यांच्या कडून मिळणाऱ्या मोफत पोकलेन मध्ये लोकसहभागातून डिझेलची व्यवस्था करून आपलं गावं जलसमृद्ध करण्यासाठी प्रयत्न करावा अशी प्रतिक्रिया तहसिलदार योगिता खटावकर यांनी येथे बोलतांना दिली.

घनसावंगी तालुक्यात शेवगळ गावातील गट क्र १७० शिवारात समस्त महाजन ट्रस्ट, मुंबई यांच्या कडून मोफत पोकलेन उपलब्ध करुन तहसीलदार श्रीमती योगिता खटावकर आणि ग्रामस्थांच्या उपस्थितीत नारळ फोडून नाल्याचे खोलीकरणाच्या कार्याला शुभारंभ करण्यात आले.




सन २०१७ मध्ये याच नाल्याचे खोलीकरण केल्यामुळे आज रोजी टँकर बंद असून शेतकरी दोन पिके घेत आहेत. गावात बैठक घेऊन ग्रामस्थांशी चर्चा करुन जलसंधारणाची कामे हाती घेण्याचा निर्णय घेऊन मोफत मिळणाऱ्या पोकलेन मशीन मध्ये डिझेल टाकण्याचा सर्वानुमते निर्णय घेण्यात आला. यावेळी सामाजिक कार्यकर्ते कांतावर सोनुने, ग्राम पंचायत सदस्य शंकर लोंढे, माजी उप सरपंच भरत अटकळ, भास्कर लोंढे, बाळासाहेब लोंढे, अंगत अटकळ, केशव लोंढे, प्रभाकर लोंढे, भागवत लोंढे, योगेश लोंढे, विकास लोंढे,समाधान लोंढे, सौरभ लोंढे, प्रसाद अटकळ, वसंतराव लोंढे, पंढरीनाथ अटकळ, रामा दहिवाळ, **पान २ वर**

# नवनियुक्त गटशिक्षणाधिकारी श्रीमती प्रेरणा लोंढे यांनी स्विकारला पदभार



**परतुर । प्रतिनिधी** - परतुर येथील गटशिक्षणाधिकारी कार्यालयातील गटशिक्षणाधिकारी व समन्वयक यांच्यावर निलंबनाची कारवाई झाल्यानंतर श्रीमती प्रेरणा लोंढे यांची नियुक्ती करण्यात आली होती. त्यांनी आज रोजी गटशिक्षणाधिकारी पदाचा कार्यभार सांभाळला यापूर्वीही त्या परतूर तालुक्यात विस्तार अधिकारी म्हणून काम पाहिले आहे. त्यांच्यासमोर बरेच प्रश्न उपस्थित आहेत ,जसे की जो शिक्षकांच्या आयकर प्रकरणाचा घोटाळा होता, तसेच आरटीओ अंतर्गत पैसे घेऊन ऍडमिशन देण्यात आले, मान्यताप्राप्त शाळेतील व कॉलेजातील शिक्षक ट्युशन घेत आहेत, त्यांच्यावर कुठल्याही प्रकारची कारवाई मागील गटशिक्षणाधिकारी यांनी केली नाही, तसेच परतुर तालुक्यातील कोणत्याही शाळेत मुलींसाठी मुलांसाठी सुलभ शौचालय फक्त अस्तित्वात आहेत परंतु ते वापरत नाहीत त्यांची दैनिय अवस्था आहे,तसेच तालुक्यातील शिक्षक हे नियमित शाळेवर येत नाहीत, मुख्याध्यापक शिक्षकांची मिली भगत दुसऱ्या दिवशी येऊन सही **पान २ वर**

# देवमूर्ती, प्रशांतनगर, चौधरीनगर भागात पाणीटंचाई

## आमदार अर्जुनराव खोतकर यांच्याकडून तातडीने पाच पाण्याचे टँकर सुरु

**जालना । प्रतिनिधी** - जालना विधानसभा मतदारसंघातील देवमूर्ती प्रशांतीनगर, चौधरीनगर, येथे तीव्र पाणीटंचाई निर्माण झाली होती. या गावातील सरपंच उपसरपंच तसेच ग्रामस्थांनी आपल्या परिसरात होणाऱ्या पाणीटंचाई संदर्भात उपाय योजना व्हावी म्हणून मागणी करत होते याची दखल घेऊन हो मागील काही दिवसापूर्वी आमदार अर्जुनराव खोतकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या पाणीटंचाई निवारण बैठकीमध्ये हा प्रश्न तातडीने सोडवावा असे संबंधिताना आदेशीत केले होते.व तत्काळ संबंधित अधिकाऱ्यांशी संवाद साधला व पाणी टंचाई दूर करण्यासाठी पाण्याचे टँकर उपलब्ध करून देण्यात यावे असे आदेशित केले त्यानुसार त्या गावासाठी पाच टँकरची पाणीपुरवठा करण्यासाठी ५ टँकर ची व्यवस्था करण्यात आली व स्वतः उपस्थित राहुन पाणी टँकरने पाणी वाटपास सुरुवात केली. या प्रसंगी प्रशासकीय अधिकाऱ्यांना सुचना केल्या व पाणी टंचाई आढावा बैठक संदर्भात सखोल अशी माहिती व पाणी टंचाई निवारणावरील कामाची स्थिती माहिती घेतली व लोकांना पाण्याचा त्रास होता कामा नये यंत्रणे कडून आणखी जास्त वेगाने काम करून घ्या असे आदेश दिले. या वेळी तत्काळ लोकांच्या मदतीला आ. खोतकर धावून आले. या करिता उपस्थित महिला भगिनी यांनी त्यांचे आभार मानले. या प्रसंगी उपस्थित शिवसेना संपर्कप्रमुख पंडितदादा भुतेकर, सरपंच, उपसरपंच, ग्रामस्थ, महिला भगिनी यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.



# संपादकीय

## मराठी मुलांची काम गिरी प्रेरणादायी

केंद्रीय लोकसेवा आयोगाने ( युपीएससी ) नागरी सेवा परीक्षा - २०२४ चा अंतिम निकाल जाहीर केला. केंद्रीय लोकसेवा आयोगाची ही परीक्षा अतिशय प्रतिष्ठेची समजली जाते. दरवर्षी विविध पदांकरिता आयोगाकडून परीक्षा घेतली जाते. दरवर्षी लाखो विद्यार्थी ही परीक्षा देतात. युपीएससीने २०२४ च्या परीक्षेसाठी आयएएस, आयपीएससह ११३२ पदांसाठी भरती जाहीर केली होती. यामध्ये १००९ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली आहे. यात ७२५ पुरुष आणि २८४ महिलांचा समावेश आहे. म्हणजेच ही परीक्षा उत्तीर्ण होणाऱ्यात महिलांची संख्याही लक्षणीय आहे. महिलांचे हे यश नक्कीच सुखावणारे आहे. या यशस्वी विद्यार्थ्यांत महाराष्ट्रातील ९० हून अधिक विद्यार्थ्यांत समावेश आहे. पहिल्या शंभर यशस्वी विद्यार्थ्यांत ७ मराठी विद्यार्थी आहेत. महाराष्ट्रासाठी ही अभिमानाची बाब आहे. पूर्वी या परीक्षेत यशस्वी होणाऱ्या उमेदवारांत मराठी विद्यार्थ्यांची संख्या नगण्य होती पण मागील काही वर्षांपासून या परीक्षेतही मराठी मुलांनी बाजी मारून मराठी मुलेही कशात कमी नाही हे दाखवून दिले आहे. केंद्रीय लोकसेवा आयोगाची ही परीक्षा अतिशय कठीण असते. नागरी सेवेमधील ही सर्वोच्च परीक्षा असून या परीक्षेत यशस्वी झालेले विद्यार्थी पुढे जाऊन प्रशासकीय अधिकारी होतात. ही परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी विद्यार्थी खूप मेहनत घेतात रात्रीचा दिवस करतात. १२ ते १८ तास विद्यार्थी अभ्यास करतात त्यातून त्यांना हे यश मिळते. या परीक्षेत यश मिळवून अधिकारी होण्याचे स्वप्न प्रत्येक विद्यार्थी पाहतो आणि जेंव्हा हे स्वप्न साकार होते तेंव्हा त्याचा आनंद फक्त त्या विद्यार्थ्याला नसतो तर त्याच्या कुटुंबीयांना, नातेवाईकांना, मित्र मंडळींना आणि समाजालाही असतो. असाच आनंद बिरदेव डोणे या गरीब मेंढपाळ असलेल्या विद्यार्थ्याला मिळालेल्या यशानंतर संपूर्ण महाराष्ट्राला झाला आहे. बिरदेव डोणेने जे यश या परीक्षेत मिळवले आहे ते प्रेरणादायी आहे. कोल्हापूर जिल्ह्यातील कागल येथील मेंढपाळ कुटुंबात जन्मलेल्या बिरदेवचे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण गावातीलच मराठी शाळेत झाले. दहावी बारावीत चांगले गुण मिळाल्यानंतर त्याने अधिकारी होण्याचे स्वप्न पाहिले आणि हे स्वप्न साकार करण्यासाठी त्याने रात्रीचा दिवस केला. पहिल्या दोन प्रयत्नात त्याला यश मिळाले नाही मात्र तिसऱ्या प्रयत्नात मात्र तो यशस्वी झाला आणि देशात ५५१ वी रँक मिळवली. केवळ बिरदेवचीच नव्हे तर या परीक्षेत यशस्वी झालेल्या सर्वच मराठी मुलांची कहाणी प्रेरणादायी आहे. जिद्द आणि ईच्छाशक्तीला मेहनतीची जोड मिळाली तर या जगात काहीही अशक्य नाही हेच या मुलांनी दाखवून दिले आहे. महाराष्ट्रातील या मुलांचे यश पाहून भविष्यात महाराष्ट्रातून आणखी सनदी अधिकारी निर्माण होतील यात शंका नाही. या परीक्षेत यशस्वी झालेले बहुतेक विद्यार्थी मराठी माध्यमातून शिकलेले आहेत हे विशेष. लाखो रुपये डोनेशन भरून इंग्रजी माध्यमात आपल्या मुलांना दाखल करणाऱ्या आणि इंग्रजी माध्यमातून शिकले तरच करियर होते असा समज असणाऱ्यांसाठी तर ही मोठी चपराक आहे. या परीक्षेत यशस्वी झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे मनापासून अभिनंदन! सनदी सेवेमध्ये मराठी मुलांचे हे यश पाहून ' मराठी पाऊल पडते पुढे! ' असेच म्हणावे लागेल.

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

## माझी आई म्हणते बाळा खूप खूप शिक...

माझी आई म्हणते बाळा खूप खूप शाळा शिक...
शाळेतील शिक्षक जे शिकवतील ते ध्यान देऊन ऐक...
शिक्षणाशिवाय नाही माणसाला कसलीच किंमत....
शिक्षणच देईल अन्यायाविरुद्ध लढायला हिंमत....

माझी आई म्हणते बाळा खूप खूप शाळा शिक...
शाळा शिकून मला शासनाच्या खुर्चीवर बसलेला दिस....
शाळा खूप शिकली पण आईची इच्छा पूर्ण नाही केली...
शिक्षण सोडून मोठी चूक केली व शेवटी पश्चातापाची वेळ आली...

माझी आई म्हणते बाळा खूप खूप शाळा शिक...
समाजात व गावात स्वाभिमानाने जगायला शिक...
अभ्यास करतोय जोमाने, नोकरी लागेल परिश्रमाने...
मी पण मोठा होईल काही दिवसाने,माझ्या अथक प्रयत्नाने...

माझी आई म्हणते बाळा खूप खूप शाळा शिक...
शिक्षणातूनच मिळते जीवनाला खरी जीत....
शिक्षणाशिवाय मनुष्य जीवन पशुप्रमाणे होय...
शिक्षणच माणसाचा खरा तारणहार होय....

माझी आई म्हणते बाळा खूप खूप शाळा शिक...
गावातील सामाजिक समस्या लिहीत लिहित...
मी पण लिहितोय निर्भीडपणे,विचार मांडतोय परखडपणे...
विचार करतोय शांतपणे, लेखणी चालवतोय प्रबळपणे....

माझी आई म्हणते बाळा खूप खूप शाळा शिक....
धमक आहे तुझ्या हाती दिलेल्या झुंजार लेखणीत...
तुझे दाखव कसब जगाला प्रथम तुझ्या निंदकाला...
गुरु मान बुद्ध फुले शाहूला माथा झुकव त्यांच्या चरणाला...

माझी आई म्हणते बाळा खूप खूप शाळा शिक...
जातीयतेला व विषमतेला गाडून टाक कायमचे मातीत...
लोकांच्या व्यथा व व्यथेच्या कथा मांड लिखाणातून...
तुझ्या झुंजार आणि प्रबळ लेखणीच्या माध्यमातून....

**-बुध्दभूषण चंद्रकांत कांबळे**
**मु.पो.खंडाळी ता.अहमदपूर जिल्हा लातूर**
**मो.७४९८७१५६६१**

# अनूसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या बचतगटासाठी मिनी ट्रॅक्टर व त्याची उपसाधने योजना

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत मागासवर्गीयांचा शिक्षणासह राहणीमान तसेच आर्थिक स्तर उंचवावा यासाठी नेहमी प्रयत्न करण्यात येत असतात. दुर्बल घटकांच्या विकासासाठी शासनाच्या सामाजिक न्याय विभागाकडून विविध योजना राबविण्यात येत असतात. त्याचाच एक भाग म्हणून अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या स्वयंसहाय्यता बचत गटांना उत्पन्नाचे साधन उपलब्ध व्हावे व त्यांच्या राहणीमानात बदल होवून सामाजिक स्थिती सुधारण्यासाठी मिनी ट्रॅक्टर व त्याची उपसाधने पुरवठा करण्याची शासनाची योजना आहे. या योजनेद्वारे १५ अश्वशक्तीचे मिनी ट्रॅक्टर, दीड टन भार क्षमतेचे नॉन टिपींग ट्रेलर व ०.८ मी. रोटाव्हेटर ९० टक्के अनुदानावर पुरविण्यात येत असतो.

स्वयंसहाय्यता बचतगटाची नोंदणी महिला आर्थिक विकास महामंडळ, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, कृषी विभागाच्या कार्यालयाकडून झालेली असावी. बचत गट चालु स्थितीतअसून नियमित आर्थिक व्यवहाराच्या नोंदीचा अभिलेख व पासबुक असणे आवश्यक आहे. मिनी ट्रॅक्टर व त्याची उपसाधने यांची कमाल किंमत ३ लक्ष ५० हजार रुपये इतकी आहे. त्यामध्ये ९० टक्के अनुदान म्हणजे ३ लाख १५ हजार रुपये शासकीय अनुदान आणि स्वयंसहाय्यता बचतगटाचा हिस्सा १० टक्के म्हणजेच ३५ हजार रुपये इतका असेल. लाभार्थी स्वयंसहाय्यता बचत गटांना अनुज्ञेय असणाऱ्या किमान ९ ते १८ अश्वशक्तीपेक्षा जास्त अश्वशक्तीचा ट्रॅक्टर व त्याची उपसाधने खरेदी करता येतील. मात्र त्याची कमाल किंमत शासकीय अनुदानापेक्षा जास्त असल्यास कमाल अनुज्ञेय अनुदानाव्यतिरीक्त जादाची रक्कम बचतगटांनी स्वतः खर्च करावी लागेल.

समाज कल्याण विभागाकडून या योजनेअंतर्गत लाभार्थी बचत गटाची निवड झाल्यानंतर बचत गटाने निर्धारित केलेल्या प्रमाणकानूसार मान्यताप्राप्त उत्पादकांकडून मिनी ट्रॅक्टर व त्याची उपसाधने शासनाने निर्धारित केलेल्या किंमतीपर्यंत खरेदी करावीत. स्वयंसहाय्यता बचत गटाने मिनी ट्रॅक्टर व उपसाधने खरेदी केल्याची पावती सादर केल्यानंतर व खातरजमा करुन लाभार्थी बचत गटाला शासकीय अनुदानाचा ५० टक्के अनुदान मिनी ट्रॅक्टर व त्याचीउपसाधने उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाकडे नोंद केल्याचे पुरावे सादर केल्यास १०० टक्के अनुदान स्वयंसहाय्यता बचत गटाच्या बँक खात्यात जमा करण्यात येतो.

स्वयंसहाय्यता बचत गटातील सदस्यांनी या अगोदर पॉवर टिलर योजनेचा लाभ घेतलेला नसावा. स्वयंसहाय्यता बचतगटाचे आर्थिक उत्पन्न वाढावे या हेतूने शासनाकडून मिनी ट्रॅक्टर योजना आहे. याबाबतची जाणीव लाभार्थी गटास आहे. त्यामुळे मिळालेला मिनी ट्रॅक्टर विकल्यास किंवा गहाण ठेवल्यास सदर व्यवहार बेकायदेशीर ठरवून स्वयंसहाय्यता बचतगटावर फौजदारी गुन्हा दाखल करण्यात येईल तसेच स्वयंसहाय्यता बचतगटाकडून शासनाने मिनी ट्रॅक्टरच्या खरेदीसाठी खर्च केलेली संपूर्ण रक्कम वसुल करण्यात येईल आणि शासनाचे अन्य योजनांचा लाभ घेण्यास किमान ५ वर्ष अपात्र ठरविले जाईल.

ट्रॅक्टर मिळाल्यास ट्रॅक्टर विमा तसेच ट्रॅक्टरचे स्थायी पंजीकरण व ट्रेलरचे पंजीकरण लाभार्थी गटास स्वखर्चाने करावे लागेल. ज्या बचतगटांनी या अगोदर अर्ज केले होते परंतू त्यांची मिनी ट्रॅक्टरचा लाभ घेण्यासाठी निवड झालेली नाही त्यांनी पुन्हा नव्याने सर्व आवश्यक कागदपत्रासह अर्ज करणे आवश्यक आहे. उद्दीष्टापेक्षा जास्त अर्ज प्राप्त झाल्यास लॉटरीपध्दतीने बचत गटांची निवड केली जाते. जे लाभार्थी बचत गट किमान मर्यादेपेक्षा अधिक अश्वशक्तीचा मिनी ट्रॅक्टर व त्याची उपसाधने यांची खरेदी करु इच्छीत असतील परंतू देण्यात येणारी रक्कम ही कमाल मर्यादीत म्हणजेच ३ लाख १५ हजार रुपयेच अनुज्ञेय राहील. कमाल मर्यादेपेक्षा जास्तीच्या अश्वशक्तीचा मिनी ट्रॅक्टर व त्याची उपसाधने खरेदीसाठी लागणारी जादाची रक्कम लाभार्थी बचत गटाने स्वतः खर्च करावी. बचत गटातील प्रत्येक सदस्यांचे आधार क्रमांक बँक खात्याशी जोडणी प्रमाणपत्र असणे बंधनकारक राहिल.

अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या इच्छुक स्वयंसहाय्यता बचत गटांनी आवश्यक कागदपत्रासह म्हणजेच जातीचे प्रमाणपत्र, अधिवास प्रमाणपत्र, पॅनकार्ड,आधारकार्ड, मतदार ओळखपत्र, शिधापत्रिका आणि विद्युत देयकाची छायांकित प्रत संलग्न करावी. अर्जाचा विहीत नमुना कार्यालयात विनामुल्य उपलब्ध असून अर्ज सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण कार्यालय, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, जिल्हाधिकारी कार्यालयासमोर, जालना येथे सादर करुन लाभ मिळवावा.

**- जिल्हा माहिती कार्यालय, जालना**

# ... नंतर पश्चाताप करून काय फायदा?

आजकालचा माणूस अविवेकी व अविचारी झाला आहे. कोणत्याही गोष्टीचा निर्णय घेताना, मागचा पुढचा जराही विचार करत नाही. कसाही घाई गडबडीत निर्णय घेऊन स्वतःला दुःखाच्या खाईत लोटत आहे. कारण घाई गडबडीने व अविवेकी बुद्धीने घेतलेला कोणताही निर्णय माणसाला असफल ठरवतो. आणि माणसाला दुःखी व निराश बनवतो. मग मात्र माणसाला डोक्याला हात लावल्याशिवाय पर्याय नसतो. माणूस सारखा तोच तो विचार करत बसतो. आपण हा निर्णय घ्यायला नको होता. आपण हा निर्णय उगाच घेतला. आपण या भानगडीत नाहक पडलो. आपण तेव्हाच योग्य विचार केला असता, तर बरे झाले असते. आपल्यावर डोक्याला हात लावून पश्चाताप करायची वेळ आली नसती. या विचाराने माणूस सारखा अस्वस्थ व बेचैन होतो. सारखा तोच तो विचार करून स्वतःला पश्चातापात पाडतो....काही विद्यार्थी शालेय शिक्षण पूर्ण झाल्यावर जेव्हा महाविद्यालयीन जीवनात प्रवेश करण्यासाठी जो निर्णय घेतात तेव्हा तो निर्णय, कोणालाही न विचारता, आपली आवड कशात आहे, हे न बघता, सुशिक्षित व जाणकार लोकांना न विचारता, आणि कोणताही मागचा पुढचा विचार न करता, आपल्या स्वतःच्या मनाने शाखा निवडतात. आणि मग मात्र त्यांना आपण या क्षेत्रात यशस्वी होऊ शकत नाही, हे जेव्हा कळते, तेव्हा ते मात्र डोक्याला हात लावून बसल्याशिवाय राहत नाहीत. त्यांना आयुष्यात आपण फार मोठी चुकी केल्याचे अतिव दुःख त्यांच्या मनाला होते. आणि ते दुःख त्यांच्या मनाला सारखे बोचत राहते. मन उदास व निराश होऊन आत्महत्येसारखा टोकाचा निर्णय घेण्याचा विचार करते. तेव्हा वेळ निघून गेलेली असते. आपले काहीच चालत नाही. तेव्हा मनाला खूप खूप पश्चाताप होतो. सारखे पुन्हा पुन्हा तेच ते विचार मनात घोंगावत राहतात. त्यांच्या मनात घर करून बसलेली खंत त्यांच्या मनाला सारखी सलत राहते. म्हणून शालेय शिक्षण पूर्ण झाल्यावर विद्यार्थ्यांनी पुढील शिक्षणासाठी आपल्या आवडीनुसार योग्य ते क्षेत्र निवडावे आणि त्या क्षेत्रात चांगले करिअर करून आपले जीवन घडवावे. म्हणजे आपल्यावर पुन्हा पश्चाताप करण्याची वेळ येणार नाही. असे मला वाटते.

काहीजण लग्नाचे योग्य वय झाले तरी नोकरीसाठी किंवा स्वतःच्या पायावर उभे राहण्यासाठी वेळेवर लग्न करत नाहीत. आज ना उद्या आपल्याला नोकरी लागेल ही आशा त्यांच्या मनात घर करून बसलेली असते. म्हणून ते लग्न करायला टाळाटाळ करतात. पण नोकरी काही लागत नाही. वय मात्र वाढत जाते. त्यांनाही कळून चुकते की आता आपल्याला काही नोकरी लागत नाही. आपण आता लग्न करून मोकळे झालेले बरे. म्हणून ते मुलींच्या शोधात असतात. त्यांना बघायला अनेक स्थळे येतात. पण त्यांचे वाढलेले वय पाहून त्यांना लग्नासाठी कोणीही होकार देत नाही. लग्न काही वेळेवर होत नाही. मनासारखी मुलगी काही केल्या भेटत नाही. मग त्यांना वाटते की, आपण तेव्हाच लग्न केले असते तर बरे झाले असते. आपल्याला तेव्हाच चांगली मुलगी मिळाली असती. आज आपण वडील झालो असतो. आता आपले खूप वय वाढले आहे. म्हणून या विचाराने ते अस्वस्थ व बेचैन होतात. डोक्याला हात लावून परत परत तोच विचार करतात. या विचाराने ते निराश व दुःखी होऊन स्वतःला संपवायचा विचार करतात. म्हणून मला वाटते की, आजच्या तरुणांनी नोकरीवर विश्वास ठेवण्यापेक्षा, योग्य वयात मनपसंत स्थळ बघून लग्न केलेले बरे. नोकरी तर आज ना उद्या लागेलच. फक्त माणसाच्या मनात जिद्द व प्रचंड इच्छाशक्ती पाहिजे. पण एकदा लग्नाची वेळ निघून गेल्यावर ती वेळ पुन्हा येणे शक्य नाही. म्हणून योग्य वयात लग्न करून मोकळे झालेले कधीही बरे. नंतर आपल्यावर पश्चाताप करण्याची वेळ येत नाही. हे आमच्या तरुणांनी लक्षात ठेवले पाहिजे. कारण असला अविवेकी व अविचारीपणा काय कामाचा? म्हणून माणसाने कोणतीही गोष्ट करण्याआधी शंभर वेळा विचार केलेला बरा. कारण विचार करून केलेली गोष्ट कधीही माणसाला विचारात पाडत नाही. पश्चातापात पाडत नाही. म्हणून माणसाने कधीही आयुष्यात शांत डोक्याने विचार करून योग्य ते निर्णय घेतले पाहिजेत. कारण शांत डोक्याने घेतलेला निर्णय माणसाला यशाच्या गावाला घेऊन जातो. माणसाला जीवनात यशस्वी करतो. माणसाला पश्चाताप करण्याची वेळ येऊ देत नाही. या जगात ज्या ज्या महान व्यक्ती होऊन गेल्या, त्या व्यक्तींनी निर्णय घेण्याआधी शंभर वेळा विचार करून, शांत डोक्याने योग्य तो निर्णय घेऊन आपल्या आयुष्यात यशाची पहाट आणली आहे. रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज हे आपल्या आयुष्यात अचूक निर्णय घ्यायचे. निर्णय घेण्याआधी खूप वेळा विचार करायचे. म्हणून छत्रपती शिवरायांनी आयुष्यात घेतलेला कोणताच निर्णय कधी फेल गेला नाही. योग्य निर्णय घेऊन केलेली लढाई ते जीवनात कधीच हरले नाहीत. हे छत्रपती शिवरायांचे खास वैशिष्ट्य होते. अफजलखानाचा कोथळा बाहेर काढण्यासाठी छत्रपती शिवरायांना केवळ दोन मिनिटे लागली होती. पण या दोन मिनिटांच्या यशस्वीतेसाठी छत्रपती शिवरायांना तब्बल दोन वर्षे नियोजन करावे लागले होते. हे आपण बहुजनांनी लक्षात घेतले पाहिजे.

महात्मा ज्योतिबा फुले, राजर्षी शाहू महाराज, छत्रपती संभाजी महाराज व डॉ.बाबासाहेब आंबेडकर या महापुरुषांनी जीवनात कधीच चुकीचा निर्णय घेतला नाही. जो निर्णय घेतला तो ठाम घेतला. विचार करून घेतला. म्हणून त्यांनी जीवनात यशोशिखर लीलया पार पाडले. म्हणून आपणही या महापुरुषांप्रमाणे योग्य तो निर्णय घेऊन, जीवनात वाटचाल केली पाहिजे. म्हणजे आपल्याला यश लवकर मिळेल. नंतर पश्चाताप करायची वेळ आपल्यावर येणार नाही... असे मला वाटते...

**- बुध्दभूषण चंद्रकांत कांबळे**
**मु.पो.खंडाळी, ता.अहमदपूर जिल्हा लातूर**
**मो.७४९८७१५६६१**

# एडव्हांटा कंपनीकडून जिल्हा परिषद शाळेत ४५ लाखांची विकासकामे

टेंभूर्णी । प्रतिनिधी - सावरगाव म्हस्के ता. जाफराबाद येथील जिल्हा परिषद शाळेला एडव्हांटा कंपनीतर्फे सी.एस.आर. फंडातून तीन वर्ग खोल्या, आर.ओ.प्लांट, आवार भिंत,वॉटर हार्वेस्टिंग, रंगरंगोटी, पेंटिंग, स्वच्छता गृह इत्यादी सुमारे ४५ लाखांपेक्षा अधिक रुपयांचे कामे पूर्ण करून देण्यात आली असून या कामांचे लोकार्पण गुरुवारी ता.२४ करण्यात आले. कंपनीचे श्री सतीश हेगडे, श्री त्रिपाठी, रेनीथा मॅडम, राहुल आकुसकर, बनसोडे, शालिकराम म्हस्के, सुरेश म्हस्के, सरपंच सौ. कोमल नितीन ढवळे, उपसरपंच दिलीप म्हस्के, सर्व ग्रामपंचायत सदस्य, केंद्रप्रमुख सुधाकर चिंधोटे, राहुल दुनगहू, निकिता कायस्थ, शाळा समिती चे अध्यक्ष आत्माराम म्हस्के, उपाध्यक्ष नंदकिशोर काकडे, कृष्णा म्हस्के, सौ. ज्ञानेश्वरी श्रीराम म्हस्के, सौ. सविता गजानन म्हस्के, विष्णू पवार, सुनील विक्रम म्हस्के, नंदकिशोर काळे, रमेश म्हस्के, सौ.शोभाबाई राजू घाडगे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी शाळेच्या वतीने मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. एडव्हांटा कंपनी ने सामाजिक भान राखून जिल्हा परिषद शाळेच्या भौतिक सुविधा विकास करण्यासाठी केलेल्या सहकार्याबद्दल शाळेच्या,गावाच्या वतीने आभार मानण्यात आले.कार्यक्रमासाठी मुख्याध्यापक मुरलीधर वायाळ, श्रीमती सुनिता देशपांडे, काकासाहेब बनकर, मुकेश ठाकूर, सिद्धेश्वर लंगोटे, श्रीमती लता चापाईतकर, कैलास जाधव, श्रीमती अंकिता धारगावे, अर्जुन राऊत यांनी परिश्रम घेतले. यावेळी गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.




## पान १ वरुन

### देशवासियांनी ...

एका विचाराने सरकारसोबत राहिले पाहिजे, इथं राजकारण आणायचं नाही. अतिरेक्यांनी जी ॲक्शन घेतली ती भारताच्या विरोधी घेतली आहे. देशाच्या विरुद्ध असं कोणी निर्णय घेते तिथं राजकारण करायचे नसते. त्या दृष्टीने आम्ही लक्ष घातले. सरकारने सर्वपक्षीय बैठक बोलावली. त्यामध्ये आमच्या पक्षाच्या वतीने सुप्रिया सुळे उपस्थित होत्या.

सरकारने हे अधिक गांभीर्याने घ्यायला पाहिजे. गेले काही दिवस सरकारच्या वतीने सतत सांगितले जात होते. आम्ही दहशतवाद मोडून काढलाय. आता काय चिंता नाही. असं होत असेल तर आनंद आहे. पण घडलेली घटना बघितल्यानंतर कुठे ना कुठे कमतरता आहे हे स्पष्ट आहे. ही कमतरता सरकारने घालवायला हवी. सरकारने अधिक गांभीर्याने घ्यावे. सरकार कमतरता आहे हे मान्य करत असेल तर त्यांनी तातडीने पावले टाकावीत. काही कामात आम्हा लोकांचं सहकार्य राहील, अशी प्रतिक्रिया त्यांनी दिली आहे.

शरद पवार पुढे म्हणाले की, इंटेलिजन्स फेल्युअर आहे हे सरळ दिसत आहे. पहलगाम हे त्यातल्या त्यात अधिक सुरक्षित आहे. दोन-तीन महिन्यापूर्वीच मी तिथे जाऊन आलो. सातत्याने आपले लोक तिथे जातात. दहशतवाद्यांनी आपले उद्दिष्ट साध्य केले, हा जो निष्कर्ष काढला जातो, तो अधिक सावधान करणारा आहे. आपण काळजी घ्यायला पाहिजे, असे त्यांनी म्हटले. तर पर्यटकांना हिंदू आहेत म्हणून गोळ्या घातल्या यामध्ये काय सत्य आहे? याबाबत मला माहिती नाही. पण तिथं जी लोक होते, त्यातील स्त्रियांना सोडले असे दिसते आहे. मी एका भगिनीच्या घरी गेलो होतो, त्यावेळी त्यांनी सांगितले आम्हा महिलांना हात लावले नाही. त्यांनी फक्त आमच्या पुरुषांना हात लावला, असे शरद पवार यांनी म्हटले आहे.

दरम्यान, दहशतवादी हल्ल्यानंतर काश्मीरमध्ये फिरण्यासाठी जाणाऱ्या पर्यटकांमध्ये भीतीचं वातावरण आहे अनेक पर्यटकांनी आपल्या बुकिंग रद्द केल्या आहेत. यामुळे काश्मीरमधील पर्यटनाला फटका बसल्याचे दिसून येत आहे. याबाबत विचारले असता शरद पवार म्हणाले की, काश्मीरच्या लोकांचे चरितार्थ हे पर्यटनावर आहे. लोक काही दिवस काश्मीरला जाणार नाहीत असेच दिसते. त्यामुळे काश्मीरच्या जनतेचं मोठे नुकसान होईल. पण एक जमेची बाजू घडली आहे, ज्यामध्ये लोक रस्त्यावर उतरले आणि ते भारताच्या बाजूने उभे राहिले, असे त्यांनी म्हटले.

### गाव जलसमृद्ध ...

चिरंजीव आदिराज अटकळ सामाजिक कार्यकर्ते महादेव मते, नरेंद्र जोगड आणि देवा चित्राल आदींची उपस्थिती होती.

### नवनियुक्त ...

करतात. या सगळ्या प्रश्नांची सहनिशा नवीन गटशिक्षणाधिकारी मॅडम करतील का ? याकडे सर्वांचे लक्ष आहे. परतुर शहरामध्ये फक्त एक शाळा वगळता कुठल्याही शाळेला सीबीएससी ची मान्यता नाही परंतु त्या शाळा स्टेट बोर्डची मान्यता असताना देखील सीबीएससी चे महागड्या प्रकाशनाची पुस्तके ठेवतात, त्यामुळे पालकांची लूटमार केले जाते .प्रत्येक वर्षी शाळेचा गणवेश बदलण्याची काहीच गरज नसताना कमिशन साठी हे संस्थाचालक ड्रेस बदलतात ,खाजगी प्रकाशनाची पुस्तके ठेवतात त्यामुळे त्यांना भरपूर प्रमाणात कमिशन मिळते. याकडे नवीन गटशिक्षणाधिकारी लक्ष देतील का ? पहिल्याच दिवशी पदभार स्वीकारून परतुर तालुक्यातील सर्व केंद्रप्रमुखांची सकाळी ११ वाजता चालू असलेल्या शैक्षणिक विषयांवर आढावा बैठक घेऊन, दुपारी ३ वाजता कार्यालयीन कर्मचाऱ्यांची विभागानुसार कामकाजाची सद्यस्थिती जाणून घेऊन आवश्यक त्या सर्व सूचना आणि करावयाचे बदल याबाबत सविस्तर आढावा बैठक घेऊन अत्यंत उत्साहपूर्ण ,शिस्तबद्ध नियोजन पूर्ण कामकाजास सुरुवात करून परतूर तालुक्यातील शिक्षण विभागाचे कामास नवीन आयाम देण्यास सुरवात केली. त्यामुळे परतूर तालुक्यात पुढील काही दिवसात शिक्षण विभाग अत्यंत पारदर्शक पद्धतीने नावारूपास येणार याबाबत काही शंका नाही.

स्वागतप्रसंगी गटशिक्षणाधिकारी कार्यालयातील आस्थापना प्रमुख,शेख सत्तार , डॉ रोडगे, शिंदे, राठोड, शेख, कवटे , पवार, खाकरे, वांगीकर इत्यादी कर्मचारी उपस्थित होते.

# कर्जत-जामखेडमधील पाणीप्रश्नासह विविध प्रश्नांबाबत आमदार रोहित पवार यांची जिल्हाधिकाऱ्यांशी चर्चा

**कर्जत । जामखेड । प्रतिनिधी** - पाणी टंचाईसह कर्जत-जामखेड मतदारसंघातील विविध प्रश्नांसाठी आमदार रोहित पवार यांनी अहिल्यानगरचे जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांची भेट घेऊन सविस्तर चर्चा केली आणि हे प्रश्न मार्गी लावण्याची मागणी केली. तसेच मतदारसंघातील पोलीस विभागाशी संबंधित विषयांवर पोलीस अधीक्षक राकेश ओला यांचीही भेट घेऊन चर्चा केली.

आमदार रोहित पवार हे मतदारसंघातील विविध प्रश्नांचा पाठपुरावा करण्यासाठी कायमच अधिकारी, मंत्री यांच्या भेटी घेत असतात. गुरुवारी त्यांनी अहिल्यानगरमध्ये जिल्हाधिकारी आणि पोलीस अधीक्षक यांची भेट घेतली. सध्या उन्हाची तीव्रता प्रचंड मोठी असल्याने पिण्याच्या पाण्याची अनेक गावांमध्ये तीव्र टंचाई निमर्माण झाली आहे. आमदार रोहित पवार यांनी वैयक्तिक स्वरुपात अनेक गावांमध्ये पाण्याचे टँकर सुरु केले असले तरी अद्याप एकही सरकारी टँकर सुरु झालेला नाही. त्यामुळे मागणी असलेल्या गावांमध्ये तातडीने टँकर सुरु करण्याची आग्रही मागणी त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे केली. शिवाय कुकडी आणि सीना कालव्यातून उन्हाळी आवर्तन सोडण्यासाठी आमदार रोहित पवार यांचा अनेक दिवसांपासून पाठपुरावा सुरु आहे. मात्र अद्याप आवर्तन सोडण्यात आलेले नाही. त्यामुळे सध्याच्या पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर पिकांसाठी आणि जनावारांना व माणसांना पिण्यासाठी या दोन्ही कालव्यातून तातडीने उन्हाळी आवर्तन सोडण्याची मागणीही त्यांनी केली. याशिवाय जनावारांच्या चाऱ्याचाही प्रश्न निर्माण झाल्याने चारा छावण्या तातडीने सुरु करण्याचीही मागणी आमदार रोहित पवार यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे केली. वैयक्तिक लाभाच्या योजनांचा लाभ घेण्यासाठी अनेक एजंटांची मध्यस्ती वाढली असल्याने यामुळे नागरिकांची फसवणूक होते. हे टाळण्यासाठी या एजंट लोकांना आळा घालावा आणि त्यांच्यावर कठोर कारवाई करण्याची मागणी त्यांनी केली. याशिवाय कर्जत आणि जामखेडच्या उपजिल्हा रुग्णालयांमध्ये शवविच्छेदन करण्यासाठी पुरेसे मनुष्यबळ उपलब्ध नसल्यामुळे नागरिकांना होणाऱ्या त्रासाचाही मुद्दा त्यांनी उपस्थित केला आणि तातडीने मनुष्यबळ उपलब्ध करून देण्याची विनंती केली. पोटखाराबा दुरुस्ती प्रक्रिया लांबणीवर टाकली जात असल्याने शेतकऱ्यांना अनेक योजनांचा लाभ घेता येत नाही. त्यामुळं ही प्रक्रिया तातडीने पार पाडण्याची गरज आहे. तसेच शेतकऱ्यांना विविध शासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी आता फार्मर आयडी बंधनकारक आहे. परंतु फार्मर आयडी काढताना सॉफ्टवेअरमध्ये वर्ग २ च्या जमिनींची किंवा पोटखराबा असलेल्या जमिनींची नोंद दिसत नाही. ही तांत्रिक अडचण दूर करण्याची विनंतीही आमदार रोहित पवार यांनी केली.

गेल्याच आठवड्यात घोड कालव्यात बुडाल्याने ताजू गावातील प्रियांका व नकोशा साबळे या सख्ख्या बहिणींचा तर त्यांना वाचवण्यासाठी गेले असताना कृष्णा पवळ या ग्रामपंचायत कर्मचाऱ्याचा मृत्यू झाला. या सर्वांना तातडीने आर्थिक मदत मिळवून देण्याची मागणीही आमदार रोहित पवार यांनी केली.

जिल्हाधिकाऱ्यांच्या भेटीनंतर आमदार रोहित पवार यांनी पोलीस अधीक्षक राकेश ओला यांचीही भेट घेऊन कर्जत-जामखेडमधील कायदा व सुव्यवस्था, अवैध वाळू उपसा, गावगुंडांचा त्रास, पोलीस प्रशासनाविरोधात नागरिकांच्या वाढत्या तक्रारी याबाबत चर्चा केली. तसेच खर्डा व मिरजगाव येथे मंजूर झालेल्या पोलीस ठाण्यांच्या इमारती सध्या भाड्याने घेतलेल्या जागेवर कार्यरत आहेत. याठिकाणी हक्काची पोलीस ठाण्याची इमारत व्हावी यासाठी सुरु असलेल्या पाठपुराव्याची माहितीही त्यांना दिली आणि सबंधित तांत्रिक बाबींच्या पुर्ततेसाठी सहकार्य करण्याची विनंती केली. मतदारसंघातील या सर्व प्रश्नांवर जिल्हाधिकारी आणि पोलीस अधिक्षक यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला असून लवकरच या प्रश्नांची सोडवणूक होईल असा विश्वास आमदार रोहित पवार यांनी व्यक्त केला आहे.

> ‘‘मतदारसंघात पाणी, टँकर, चारा, उन्हाळी आवर्तन, फार्मर आयडी, एजंटांची सुळसुळाट असे अनेक प्रश्न आहेत. परंतु पदावर असलेल्या काही नेत्यांना या प्रश्नात लक्ष घालण्याऐवजी राजकीय फोडाफोडीतच अधिक रस असल्याचे दिसते. परंतु कर्जत-जामखेडकरांनी टाकलेल्या विश्वासामुळं त्यांच्याशी संबंधित प्रश्न सोडवण्यासाठी जिल्हाधिकारी साहेब आणि पोलीस अधीक्षक साहेब यांची भेट घेऊन त्यांच्याशी चर्चा केली. त्यांनीही या प्रश्नांबाबत सकारात्मक भूमिका घेतली. त्यामुळं पुढील काही दिवसात हे प्रश्न सुटतील अशी अपेक्षा आहे.
>
> **रोहित पवार**
> **(आमदार, कर्जत-जामखेड )**



# शेतकऱ्याचा विद्युत तारेचा शॉक लागून मृत्यू

**मंठा । प्रतिनिधी -** तालुक्यातील खवणें देवगाव येथील भारत विठ्ठलराव मोरे वय ५४ वर्षे हे नेहमी प्रमाणे गुरुवार रोजी रात्री शेतात झोपायला गेले होते.परंतु सकाळी उठून दुध घेऊन घरी आले नाही म्हणून मुलगा संजय भारत मोरे हा सकाळी सात वाजता त्यांना पाहण्यासाठी शेतात गेला असता वडिलांना विद्युत तार तुटून शॉक लागून ते मयत झाल्याचे दिसून आले. खवणे देवगाव येथील अल्पभूधारक शेतकरी भारत मोरे हे दररोज रात्री शेतात झोपण्यासाठी जात होते.रात्री शेतात झोपून सकाळी सहा वाजता दूध घेऊन नेहमी घरी येत होते. गुरुवार दि.२४ एप्रिल रोजी रात्री शेतात झोपण्यासाठी गेले अन् नेहमीच्या वेळेत म्हणजे सकाळी सहा वाजता ते घरी आले नाही,म्हणून त्यांचा मुलगा संजय मोरे हा २५ एप्रिल शुक्रवार रोजी सकाळी सात वाजता शेत गट न.५७३ मध्ये वडिलांना पाहण्यासाठी शेतात गेला असता शेतात विद्युतचा तार तुटून वडिल मयत झाल्याचे त्याच्या निदर्शनास आले. दरम्यान रात्री बोअरवेलची मोटार सुरू करण्यासाठी ते बोअरवेलकडे जात असावेत आणि जात असताना शेतात तुटून पडलेल्या विद्युत तारेला त्यांचा स्पर्श झाला त्यात त्यांचा मृत्यू झाला असे नातेवाईकांकडून सांगण्यात आले. भारत मोरे हे अल्पभूधारक शेतकरी असून ते घरातील करते पुरुष होते,सर्व कुटुंब त्यांच्यावर अवलंबून होते.त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुलं,एक मुलगी असा परिवार आहे.त्यांच्या मृत्यूने देवगाव खवणे व परिसरातील गावांमध्ये हळहळ व्यक्त केली जात आहे.



या घटनेची माहिती मिळताच परतूर पोलिसांनी घटनास्थळी जाऊन पंचनामा करून शव विच्छेदनासाठी मंठा ग्रामीण रुग्णालयात पाठवले.शव विछेदनानंतर नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आले.या घटने संदर्भात परतूर पोलिस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. मयत भारत मोरे हे अल्पभूधारक शेतकरी अत्यंत कष्टाळू होते. तसेच ते आर्थिक परिस्थितीने अत्यंत गरीब असल्याने मुख्यमंत्री सहाय्यता निधी आणि महावितरण कंपनी कडून त्यांच्या कुटुंबियांना नुकसान भरपाई देण्याची मागणी माजी सभापती किसनराव मोरे आणि किसान मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष राजेश मोरे यांनी केली आहे.




# टेंभुर्णी येथे व्यापारी महासंघाच्या वतीने दहशदवादी हल्ल्याचा निषेध

**टेंभुर्णी** - येथील बाजार गल्ली, मंगल कार्यालय हनुमान मंदिर ते मेन रोड मारवाडी गल्ली राम मंदिर माळी गल्ली ते सावता चौक या दरम्यान कॅन्डल मार्च काढून २२ तारखेला झालेल्या पहलगाम येथील भ्याड आतंकी हल्ल्याच्या निषेध करत मरण पावलेल्या नागरिकांना भावपुर्ण श्रद्धांजली दिली. या श्रद्धांजली कार्यक्रमात राजकीय आणि प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते.

# काळसुसंगत शिक्षण आणि अपार कष्ट हेच यशाचे खरे सूत्र - प्रा . डॉ . भगवानसिंग डोभाळ

**मंठा । प्रतिनिधी -** काळाच्या गरजेनुसार शिक्षण आणि त्याच्यासोबत विद्यार्थ्यांनी अपार कष्ट घेण्याची तयारी ठेवली तरी यश सहज मिळू शकते असे प्रतिपादन डॉ . बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या आधी सभेचे सदस्य डॉ . भगवानसिंग डोभाळ यांनी केले ते मंठा येथील स्वामी विवेकानंद महाविद्यालयात आयोजित पदवीप्रदान कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते . कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ .माणिकराव थीटे हे होते . कार्यक्रमाचा प्रारंभ सर्वप्रथम पदवीप्राप्त विद्यार्थी आणि सर्व कर्मचारी यांच्या मिरवणुकीने झाला. नंतर प्रमुख पाहुण्याच्या हस्ते दीप प्रज्वलन करण्यात येऊन सर्व विद्यार्थ्यांना प्रमुख पाहुण्याच्या हस्ते पदवी प्रदान करण्यात आल्या . यावेळी प्रा . डॉ . डोभाळ म्हणाले की विद्यार्थी दशेत आणि आयुष्यभर प्रत्येकाने गुणग्राहकता ,जिद्द आणि अपार कष्ट करण्याची तयारी ठेवली पाहिजे . अध्यक्षीय समारोप करताना डॉ . माणिकराव थीटे म्हणाले की आजचा विद्यार्थी हा काळाची पावले ओळखणारा असावा विद्यार्थी दशेत जर तुम्ही आपल्या हिताशी जागरूक राहून अभ्यास करत राहिला तर तुमचे भविष्य नक्कीच उज्वल होईल .यावेळी व्यासपीठावर डॉ . सुधाकर जाधव डॉ . सदाशिव कमळकर प्रा . संभाजी तिडके यांची प्रामुख्याने उपस्थिती होती . कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.भरत धोत्रे यांनी तर प्रमुख पाहुण्याचा परिचय डॉ . संतोष वानखेडे यांनी करून दिला सूत्रसंचालन डॉ. राजेंद्र काकडे तर आभार प्रदर्शन डॉ. दक्षता देशमुख मॅडम यांनी केले .या कार्यक्रमाच्या



यशस्वीतेसाठी डॉ. वसंत जागृत, डॉ . भागवत खरात डॉ . राजेश गायकवाड, कार्यालयीन अधीक्षक दत्ता कडूकर, श्री अशोक मुळे यांनी प्रयत्न केले. शेवटी कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने झाली.




## व्हिडिओ निर्मिती स्पर्धेत शिक्षिका शैलजा मोटे यांचे यश

**दौंड -** राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र. जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था पुणे आयोजित शिक्षकांसाठी दर्जेदार शैक्षणिक व्हिडिओ निर्मिती स्पर्धा २०२३ आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेचा दौंड तालुकास्तरीय बक्षीस वितरण समारंभ नुकताच मनोरमा मेमोरियल गर्ल्स हायस्कूल केडगाव या ठिकाणी पार पडला. या स्पर्धेत जि. प. प्राथ.शाळा बेटवाडी , ता. दौंड च्या शिक्षिका सौ. शैलजा शरद मोटे यांनी तालुकास्तरावर तीन वेगवेगळ्या गटात प्रथम क्रमांक व एका गटात द्वितीय क्रमांक प्राप्त केला. या उल्लेखनीय यशाबद्दल त्यांना या कार्यक्रमात जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था पुणे च्या अधिव्याख्याता मा. तोरणे मॅडम, दौंड तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी मा. महाजन साहेब व इतर मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात आले. याप्रसंगी मनोरमा मेमोरियल गर्ल्स हायस्कूलच्या मुख्याध्यापिका , केंद्रप्रमुख ,पंचायत समिती दौंड चे सर्व विषयतज्ञ व शिक्षक उपस्थित होते.

**झाडे लावा झाडे जगवा**

# १०० शिक्षक द्या, बलशाली देश घडविन - प्रमोद कुमावत

**जालना । प्रतिनिधी -** १०० शिक्षक क्लबने आयोजित केलेल्या शिवजयंती निमित्त गडकिल्ल्यांची माहिती सांगणारी निबंध लेखन स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ शहरातील शांतिनिकेतन विद्यामंदिर येथे पार पडला. त्याप्रसंगी जालना डायटचे अधिव्याख्याता कुमावत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना बोलत होते.

बुद्धीची मालकी ज्याच्याकडे असेल तो येणाऱ्या काळात जगावर राज्य करेल असे सांगुन निबंध लेखनाच्या अनुषंगाने मार्गदर्शन केले. पत्रकार राजेश भालेराव, माया कवानकर व कार्यक्रमाचे अध्यक्ष मुख्याध्यापक आर. आर. जोशी यांनी ही विद्यार्थ्यांना

मार्गदर्शन केले. कार्यक्रमास डॉ. शिवनंदा मेहेत्रे, जवाहर तुल्हे, मुअ ज्ञानेश्वर गाढवे व राहुल पंडागळे यांचीही उपस्थिती होती. तत्पूर्वी शिक्षक क्लबचे अध्यक्ष राजेभाऊ मगर यांनी प्रास्ताविक करतांना निबंध लेखन स्पर्धा आयोजित करण्यामागची भुमिका विशद केली. यासाठी शिक्षक समूहातर्फे शिवजन्मोत्सवानिमित्त शालेय विद्यार्थ्यांसाठी शिवकालीन गडकिल्ल्यांची माहिती सांगणारी निबंध लेखन स्पर्धा १९

फेब्रुवारी ते १९ मार्च २०२५ या कालावधीत आयोजित करण्यात आली होती.



यात विद्यार्थ्यांनी भरघोस प्रतिसाद देत निबंध स्पर्धेत ६१७विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. त्यातील गुणाणुक्रमे आलेल्या पहिल्या २० विद्यार्थ्यांचा सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन विशेष गौरव करण्याचा कार्यक्रम आज संपन्न होत आहे अशी माहिती दिली. बक्षीस वितरण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन साजिद

खान पठाण यांनी तर आभार मनिषा पाटील यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मुअ प्रकाश कुंडलकर, प्रा. दिपक चाटे, रामेश्वर अंबेकर, संदीप इंगोले, अशोक माधवले, मंदाकिनी खलसे व १०० शिक्षक क्लब च्या पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले. या निबंध स्पर्धेतील विजेते विद्यार्थी भक्ती भगवान मते व भाग्यश्री नंदकुमार गिराम वर्ग ९ वा. ब, शांतीनिकेतन विद्यामंदिर, जालना, आनंदी

संगमेश्वर वाघमारे, वर्ग ८ वा अव श्रावणी शिवाजी गाजरे वर्ग ९ वा ब, संस्कार प्रबोधिनी माध्यमिक विद्यालय, जालना, जयश्री गजानन फलके वर्ग ८ वा, जिजामाता विद्यालय, निमखेडा (खुर्द) ता. जाफ्राबाद, अदिती निरज राय व अनन्या कपिल वाघमारे, वर्ग ८ वा ब, कै. बाबुराव जाफ्राबादकर माध्यमिक विद्यालय, जालना, शुभम शिवलाल चव्हाण व कुमकुम ताराचंद कनिसे वर्ग ९ वा अ, जीवनराव पारे विद्यालय, जालना, अमोघ रामदास कुलकर्णी, वर्ग ७ वा, श्री. एम. एस. जैन स्कूल जालना, अक्षरा अंबादास घाडगे, वर्ग ९ वा ब, कै. दादासाहेब देशमुख जि. प. प्रशाला, घनसावंगी, सार्थक संतोष गोळे, वर्ग ८ वा, जि.

प. प्रा. शाळा, बारसवाडा ता. अंबड, अक्षरा सखाराम मोरे, वर्ग ९ वा ब, पीएमश्री जि. प प्रशाला राणीउंचेगाव ता. घनसावंगी, अंकिता सुंदर मुळे वर्ग ८ वा, जि. प. प्राथ. शाळा आवलगाव ता. घनसावंगी, भक्ती गणेश गवारे, वर्ग ६ वा. प्रयाग प्राथमिक विद्यालय, जालना, वैभव सुरेश हिवाळे, वर्ग ९ वा, जि. प. प्रशाला मुलांची, जालना, वेदा विवेक कुलकर्णी वर्ग ६ वा संस्कार प्रबोधनी प्रा. वि. जालना, सलमा पाशु शेख, वर्ग ९ वा, ईबीके उर्दू विद्यालय, टेंभुर्णी ता. जाफ्राबाद, ऋतुजा दत्ता डिखुळे, वर्ग ८ वा, जि. प. प्राथ. शाळा भिलपुरी, (खुर्द) ता. जि. जालना व दर्शना सुरेश लबडे, वर्ग ५ वा, अहिल्यादेवी प्राथमिक विद्यालय, जालना इत्यादी.

## ५ मे रोजी लोकशाही दिनाचे आयोजन

**जालना । प्रतिनिधी -** जिल्हास्तरीय लोकशाही दिनाचे महिन्याच्या पहिल्या सोमवारी आयोजन करण्यात येते. त्यानूसार जालना येथील जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हास्तरीय लोकशाही दिन सोमवार दि. ५ मे २०२५ रोजी सकाळी १० ते दुपारी १२ या वेळेत आयोजित करण्यात आला आहे. अशी माहिती उपजिल्हाधिकारी नम्रता चाटे यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे दिली आहे.

लोकशाही दिनात अर्जदाराने विहित नमुन्यातील अर्ज १५ दिवस अगोदर दोन प्रतीत सादर करणे आवश्यक आहे. लोकशाही दिनासाठी अर्ज देताना संबंधित तालुक्यातील तिसऱ्या सोमवारी तालुकास्तरीय लोकशाही दिनामध्ये अर्ज दिलेला असावा व तालुकास्तरीय लोकशाही दिनात एक महिन्यापेक्षा जास्त कालावधी होऊन देखील कोणतीही कार्यवाही झालेली नसावी अशाच अर्जदारांनी टोकन क्रमांकाच्या पावतीसह अर्ज दोन प्रतीत सादर करावा. लोकशाही दिनामध्ये न्याय प्रविष्ट प्रकरणे, राजस्व, अपील, सेवाविषयक, आस्थापनाविषयक बाबी, विहित नमुन्यात नसणारे व आवश्यक ती कागदपत्रे न जोडलेले अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत. तसेच तालुकास्तरीय लोकशाही दिनातील टोकन क्रमांकाची तहसीलदार यांच्या स्वाक्षरीची पोहोच पावती व त्यासाठी दिलेल्या मुदतीत व नमुन्यात ज्यांनी यापूर्वीच्या आवश्यक कागदपत्रासह अर्ज केले असतील त्यांना तक्रार मांडता येईल. ज्यांनी यापूर्वी जिल्हास्तरावरील लोकशाही दिनी तक्रार अर्ज दिलेला आहे परंतु अद्याप कार्यवाही झालेली नाही, अशा तक्रारदारांनी पुन्हा अर्ज करु नयेत. तसेच लोकशाही दिनात द्यावयाच्या अर्जाचा विहित नमुना https://jalna.nic.in या संकेतस्थळावर उपलब्ध असल्याचे प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविण्यात आले आहे.




हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.